Impact Factor - 6.261 ISSN - 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL
PEER REFREED & INDEXED JOURNAL
February - 2019 SPECIAL ISSUE- 138

# Effect of Demonetisation on Indian Economy




Guest Editor :
Dr. R. N. Bhavare
Principal
M.V.P. Samaj's K.G.D.M. Arts,
Commerce & Science College, Niphad
Tal. Niphad, Dist. Nashik [M.S.] INDIA

Chief Editor :
Dr. Dhanraj T. Dhangar
Yeola, Dist. Nashik (MS) India.

Executive Editor of the issue :
Prof. S.E. Brahmankar
Head, Dept. of Commerce
Prof. A. L. Gaikwad
Head, Dept. of Economics
M.V.P. Samaj's K.G.D.M. Arts,
Commerce & Science College, Niphad,
Tal. Niphad, Dist. Nashik [M.S.] INDIA

RESEARCH JOURNEY

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February -2019 Special Issue – 138

## Effect of Demonetisation on Indian Economy

**Guest Editor:**
Dr. R. N. Bhavare
Principal
M.V.P. Samaj's K.G.D.M. Arts, Commerce & Science College,
Niphad, Tal. Niphad, Dist. Nashik [M.S.] INDIA

**Executive Editor of the issue:**
Prof. S.E. Brahmankar
Head, Dept. of Commerce
M.V.P. Samaj's K.G.D.M. Arts, Commerce & Science College,
Niphad, Tal. Niphad, Dist. Nashik [M.S.] INDIA

Prof. A. L. Gaikwad
Head, Dept. of Economics
M.V.P. Samaj's K.G.D.M. Arts, Commerce & Science College,
Niphad, Tal. Niphad, Dist. Nashik [M.S.] INDIA

**Chief Editor:**
Dr. Dhanraj Dhangar (Yeola)

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher

## Editorial Board

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV'S Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
**Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)**
**Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)**
**Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)**
**Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)**

**Co-Editors -**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik.
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon.
- **Prof. Vinay Madgaonkar** - Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik** - Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh** - Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon
- **Dr. Samjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari
- **Prof. Vijay Shirsath** - Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.]**
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul **[M.S.]**
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik **[M.S.]**
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.]**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.]**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.]**

**Advisory Board -**
- **Dr. Marianna kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS., Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Act. Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**
- **Dr. J. S. More** – BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**– BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali** , HOD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** – Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar** – M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

**Published by –**
**© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 138- Effect of Demonetisation on Indian Economy
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

## INDEX


| No. | | | |
|---|---|---|---|
| 1 | Demonetisation in India | Dr. Girishkumar Rana | 05 |
| 2 | A Research Paper on Inventory Turnover Ratio of the Selected Tea Companies in India | Jignesh Vaghela & Prin. Dr. K.N.Chavda | 18 |
| 3 | Demonetization: A Structural Transformation of Economy | Dr. Bhavini Patel | 25 |
| 4 | A Critical Study of Social Impact of Demonetization in India | Dr.Yamini Pandey | 29 |
| 5 | Impact of Demonetisation on the Indian Economy | Dr. Vyankatesh More | 34 |
| 6 | A Review on the Impact of Demonetization on Indian Economy | Prof. A. L. Gaikwad | 38 |
| 7 | Impacts of Demonetization on Various Sectors in Indian Economy | Prof.Smt.S.E.Brahmankar | 41 |
| 8 | Demonetization: Effects on Indian Economy | Prof.R. A. Ahire | 44 |
| 9 | A Study of Demonetization and Its Effect with Reference to Unorganized Sector in Nasik | Dr. Chandrakant Chaudhari | 48 |
| 10 | Impact of Demonetization on Rural India | Dr. Rupali R. Shinde | 52 |
| 11 | Demonetization and its Impact on Marketing, Banking and Economy | Dr. Smt. S. A.Gaikwad | 55 |
| 12 | Impact of Demonetization on Indian Economy | Dr. M.B.Wagh | 59 |
| 13 | Impact of Demonetization on Indian Agricultural Sector | Dr. Parag Kadam | 63 |
| 14 | People Choice on Career: A Comparative Study | Mr. Vishvnath Borse | 67 |
| 15 | Impact of Demonetization in Agriculture | Prof. Pundlik Bagul | 71 |
| 16 | Demonitisation and its Impact on Various Sector | Dr. Jyoti Pawar | 73 |
| 17 | Demonetisation and Promotion of Cashless Economy | Prof. Manoj Gawale | 76 |
| 18 | Demonetisation : Challenges for Cashless Economy in Rural India | H. R. Netare | 81 |
| 19 | Sectoral Implications of Demonetization Agricultural, Industry, Service, Small Scale Sector etc. | Asst. Prof. Y.S.Jadhav | 85 |
| 20 | Impact of Demonetization on Direct Taxes | Prof. Gopal Layare | 88 |
| 21 | Impact of Demonetization on Retail Marketing | Mrs. Tejasweeta Mundhe | 92 |
| 22 | Two Sides of Demonetization in Indian Economy | Prof. M.B. More | 96 |
| 23 | Need of Demonetisation and Impact on Various Sectors in India | Prof. Nitin G. Chaudhari | 99 |
| 24 | Demonetization: A Move in Haste | Prof. Anil B Jadhav | 103 |
| 25 | Demonetisation : Indian Economy | Prof. R. T. Tuplondhe | 106 |
| 26 | Implication of Demonetisation on Agriculture Sector | Ms. Sonali Kasbe | 109 |
| 27 | Demonetization: an Overview | Prof. S. R. Sakhala | 115 |
| 28 | Macro-Economic Impact of Demonetisation on India's Manufacturing MSMES : an Inspection | Anusuya Biswas | 119 |
| 29 | India Since Demonetization of 2016 | Ms. Vandita Mishra | 120 |
| 30 | भारतीय अर्थव्यवस्था आणि विमुद्रीकरण | डॉ.अमित कवठाळे | 121 |
| 31 | भारतीय अर्थव्यवस्थेवरील विमुद्रीकरणाचे परिणाम : एक अभ्यास | डॉ.लता कमलापुरे | 124 |
| 32 | विमुद्रीकरण : कारणे, परिणाम आणि वास्तव | डॉ.दिपक कारे | 128 |
| 33 | भारतीय अर्थव्यवस्था : एक दृष्टीकोन | Dr. Shivaji Thore | 133 |

| | | | |
|---|---|---|---|
| 34 | कॅशलेस अर्थव्यवस्था | डॉ.मनीषा आहेर | 136 |
| 35 | नोटबंदी - भारतीय अर्थव्यवस्थेवर केलेले विनाकारण सर्जिकल स्ट्राईक | डॉ.बी.सी.आहेर | 140 |
| 36 | भारतीय शेती क्षेत्रावर नोटाबंदीचा झालेला परिणाम | प्रा.श्रीमती मंजुषा भंडारे | 142 |
| 37 | नोटाबंदीचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील परिणाम | प्रा.सुनील कर्डक | 144 |
| 38 | भारत के कृषी क्षेत्र में विमुद्रीकरण का प्रभाव | प्रा. नितीन वामन | 147 |
| 39 | नोटाबंदी (विमुद्रीकरण\निश्चलनीकरण) | प्रा.कृष्णा पाडवी | 150 |
| 40 | निश्चलनीकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम : चिकित्सक अभ्यास | प्रा.प्रविण आहेर | 156 |
| 41 | नोटावंदीमुळे अल्पभूधारक व भूमीहीन मजूरांवर झालेला परिणाम | प्रा.अतुल आहेर | 159 |
| 42 | विमुद्रीकरणाचे भारतीय शेतीक्षेत्रावरील परिणाम | प्रा.शशिकांत सांगळे | 162 |
| 43 | भारतीय अर्थव्यवस्थेवरील नोटावंदीचे आर्थिक परिणाम | प्रा.उषा आहेर | 165 |
| 44 | नोटाबंदीतून कॅशलेस अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने वाटचाल | प्रा.योगेश आहेर | 168 |


*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 138- Effect of Demonetisation on Indian Economy
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

# नोटाबंदी (विमुद्रीकरण/निश्चलनीकरण)

**प्रा.कृष्णा रावा पाडवी**
अर्थशास्त्र विभाग
कर्मवीर आबासाहेब तथा ना.म सोनवणे,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
सटाणा, ता. बागलाण जि. नाशिक.
मो. नं ०९९२२९९९२५५
Email Id : krishnarawapadvi5555@gmail.com

**प्रस्तावना :**

अर्थव्यवस्थेतील बेहिशेबी पैसा वाढला की त्यावर नियंत्रण आणण्यासाठी ठरावीक मूल्याचे चलन अर्थव्यवहारातून बाद करणे म्हणजे नोटाबंदी (विमुद्रीकरण/ निश्चलनीकरण) होय. नोटाबंदीच्या ऐतिहासिक निर्णयाला ८ नोव्हेंबर २०१७ रोजी १ वर्ष पूर्ण झाले, या एक वर्षात पाचशे आणि एक हजाराच्या रद् केलेल्या नोटापैकी ९९ टक्के नोटा (मूल्य १५.३३ लाख कोटी रुपये) जमा झाल्या, तर १.०४ टक्के म्हणजे १६,०५५ कोटी रुपये बँक व्यवहाराबांहेर राहिले अशी माहिती रिझवर्ह बँकेने दिली. नोटाबंदीमुळे १७.७३ लाख संशयित प्रकरणे उघडकीस आली २३.२२ लाख खात्यांमध्ये अंदाजे ३.३८ लाख कोटी रुपयांची संशयित रोकड जमा झाली. दि. ८ नोव्हेंबर २०१६ रोजी भारत सरकारने पाचशे आणि हजाराच्या नोटा चलानातून रद् केल्या होत्या आणि त्यानंतर ५०० आणि २००० च्या नोटा चलनात आणल्या. काही दिवसांनंतर २०० रुपयांची नोटही चलनात आणली.

**शोधनिबंधाची उदिष्टे :**

१. नोटाबंदी विमुद्रीकरण जिरचलनीकरणा बाबत अभ्यास करणे
२. नोटाबंदी नंतर अर्थव्यवस्थेत झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तूत शोध निबंधासाठी दुय्यम साधन सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे उदा. विविध संदर्भ पुस्तके, क्रमिक पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके, विविध लेख, विविध वार्षिक अहवाल, विविध संकेत स्थळे इत्यादीच्या संशोधनासाठी वापर केलेला आहे.

**अ ) नोटाबदी आतापर्यंत तीन वेळा :**

१. स्वातंत्र्यानंतर जानेवारी १९४६ मध्ये १००० आणि १०,००० रुपयांची नोटबंदी करण्यात आली होती.
२. जानेवारी १९५४ मध्ये १०००, ५०० आणि १०,००० रुपयांची नोट चालू करण्यात आली.
३. १६ जानेवारी १९७८ मध्ये जनता पार्टी सरकाने १०००, ५०० आणि १०,००० रुपयांच्या नोटा चलनातून बाद केल्या.
४. ८ नोव्हेंबर २०१६ मध्ये ५०० आणि १००० रुपयांच्या नोटा चलनातून बाद करण्यात आल्या. या नोटांचे चलनातील प्रमाण ८६ टक्के होते.

स्वातंत्र्यानंतर जानेवारी १९४६ मध्ये १००० आणि १००० रुपयांची नोटाबंदी केली. चलनात नवीन नोटा जानेवारी १९५४ मध्ये ५००, १०००, आणि १०,००० रुपयांची नोट चालू केली. १६ जानेवारी १९७८ मध्ये जनता पार्टी सरकाने १०००, ५०००, १०,००० रुपयांची नोटांबदी केली. ८ नोव्हेंबर २०१६ मध्ये ५००, १००० रुपायांची नोटाबंदी केली चलनातील प्रमाण ८६ टक्के होते.

**ब) नोटाबंदीचा लेखाजोखा**

**३० ऑगस्ट २०१७ रोजी २०१६ -२०१७ चा वार्षिक अहवालानुसार :-**

रद्द नोटा : पाचशे व एक हजार, पाचशेच्या नोटा : १७१६.५ कोटी , एक हजाराच्या नोटा : ६८५.८ कोटी, ५०० आणि १००० नोटांचे एकूण मूल्य १५.४४ लाख कोटी, आरबीआयकडे जमा नोटा रक्कम : १५.२८ लाख कोटी, केवळ १.०४ म्हणजे १६,०५० कोटी जमा न झालेल्या नोटा, नवीन नोटांसाठी छपाई खर्च २१,००० कोटी , चलनातील बँक नोटांची संख्या ११.१% वाढली यात १० व १०० रुपयांच्या नोटांचे प्रमाण ६२% आहे २०१६ मध्ये ते ५३% होते,बनावट नोटांमध्ये वाढ : २०.४% होती.

**क) नोटाबंदीच्या निर्णयाची कारणे (नोटाबंदी मागीलकारणे)**

१. **समांतर अर्थव्यवस्था :** देशात मोठया प्रमाणावर काळया पैशांची समांतर अर्थव्यवस्था निर्माण झाली होती.
२. **दहशतवादाला आळा :** हा काळा पैसा बाहेर काढण्यासाठी, रोखविरहित अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी दहशतवादाला आळा घालण्यासाठी नोटाबंदी करण्यात आली.
३. **काळे धन :** भ्रष्टाचारातून निर्मित अवैध संपती, तस्करी, गुन्हेगारी, अंमली पदार्थांचा चोरटा व्यापार, हवाला माध्यामातून ओतला जाणारा पैसा, कर चुकवलेला पैसा म्ळणजे काळे धन होय.
४. **एकूण चलन मुल्य :** भारतीय एकूण चलनाच्या मूल्याच्या ८४% रक्कम ५०० आणि १,००० च्या नोटांमध्ये उपलब्ध होते.
५. **समांतर अर्थव्यवस्था :** काळा पैसा व बनावट नोटांच्या माध्यामातून भारतात समांतर अर्थव्यवस्था. अर्थव्यवस्थेची गती मंद होती.
६. **बनावट नोटांचा वापर :** दहशतवाद्यांकडून बनावट नोटांचा वापर मोठया प्रमाणावर होत होता.

**ड) नोटाबंदीचे सरकारकडून सांगितले जाणारे फायदे**

१) काश्मीरमधील ७५ टक्के दगडफेकीच्याघडना कमी
२) ७.३२ लाखाचे बनावट चलन सापडले
३) बोगस कंपन्यांचा काळा पैसा समोर आला
४) २.४५ लाख बोगस कंपन्या बंद करण्यात आल्या
५) नोटबंदीने करदात्यांच्या संख्येत २६.६% नी वाढ झाली
६) २०१५-१६ मध्ये ६६.५ लाख करदाते
७) २०१६-१७ मध्ये प्रमाण ८४.२१ लाखांवर गेले.
८) डिजिटल व्यवहाराचे प्रमाण ५८% वाढले.

काश्मीरमधील ७५ टक्के दगडफेकीच्या घटना कमी झाल्याचे सरकारचे म्हणणे. ७.६२ लाखांचे बनावट चलन सापडले. बोगस कंपन्याचा काळा पैसा समोर आला २.२४ लाख बोगस कंपन्या बंद करण्यात आल्या. नोटाबंदीने करदात्यांच्या संख्येत २६.६% नी वाढ झाली. २०१५-१६ मध्ये ६६.५ लाख करदाते २०१६-१७ मध्ये प्रमाण ८४.२१ लाखांवर गेले. डिजिटल व्यवहाराचे प्रमाण ५८ टक्क्यांनी वाढले. सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियनॉमीच्या आकडेवारीनुसार जानेवारी ते एप्रिल २०१७ मध्ये रोजगार असलेल्यांची संख्या ४० कोटी ५० इतकी होती, तर २०१६ मध्ये सप्टेंबर ते डिसेंबर या कालावधीत देशातील ४० कोटी ६७ लाख लोकांकडे रोजगार होता. नोटाबंदीनंतर जानेवारी ते एप्रिल २०१७ या कालावधीत १५ लाख लोकांनी रोजगार गमावला.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 138- Effect of Demonetisation on Indian Economy
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

**इ )नोटाबंदी / विमुद्रीकरण/ निश्चलनीकरण /काही ठळक :**

प्राप्तिकर विवरण पत्रे भरण्याच्या संख्येतील वाढ (गत वर्षांच्या तुलनेत) ९.९% , ५ ऑगस्ट, २०१७ पर्यंत विवरणपत्र भरणाऱ्या लाकांच्या संख्येतील वाढ २४.७% , नोव्हेंबर २०१६ ते मे २०१७ पर्यंत अघोषित उत्पन्नाची नोंद १७,५२६ कोटी, जप्त केलेली रक्कमः १,००३ कोटी रुपये होते.

**ई) विमुद्रीकरण आणि मुद्रीकरणाचे भारतातील यापूर्वीचे प्रयत्न :**

१) १९३८: दहा हजार रुपये किमतीची नोट छापली.
२) १९४६ : १,००० व १०,००० रुपयांच्या नोटा चलनातून बाद
३) १९५४ : १,०००,५००० आणि १०,००० ची नोट पुन्हा चलनात
४) १९७८ : १,०००,५००० व १०,००० च्या नोटा चलनातून बाद
५) १९८७ : ५०० ची नोट चलनात
६) २००० : १,००० ची नोट चलनात
७) २०१६ : जुन्या ५०० व १००० ची नोट चलनातून बाद
८) २०१७ : ५०,२००,२००० च्या नवीन नोटा चलनात

**उ) विमुद्रीकरण झालेले देश :**

प्रामुख्याने विमुद्रीकरण झालेले देश उदा. इंग्लंड, घाना, नायजेरिया, म्यानमार, ऑस्ट्रेलिया, सोव्हिएत रशिया, झ रे, युरोपीय महासंघ, झिम्बाब्वे, उत्तर कोरिया इ.

**ऊ) निश्चलीकरण**

१. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने प्रसिध्द केलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेच्या आकडेवारीवरील हस्तपुस्तिकेनुसार (२०१५-१६) मार्च २०१६ च्या अखेरीस देशात एकूण १६.४२ लाख कोटी रुपये किमतीच्या नोटा चलनात होत्या. यापैकी १४.१८ लाख रुपये हे ५०० आणि १००० रुपयांच्या नोटांच्या स्वरुपात होते. हे प्रमाण चलनात असलेल्या एकूण नोटा आणि नाण्यांच्या सुमारे ८६ % होते.
२. नोटांच्या आकडयाच्या भाषेत बोलायचे तर ५०० आणि १००० रुपयांच्या २२०० कोटी नोटा चलनात होत्या. हे प्रमाण चलनात असलेल्या एकूण नोटांच्या २६% होते.

**ए) नोटाबंदीचे परिणाम**

१. **नोटाबंदीच्या निर्णयापूर्वी चलनात असलेल्या नोटांची संख्या :** १५.४४ लाख कोटी. ३० जून २०१७ पर्यंत भारतीय रिझर्व्ह बँकेत १५.२८ लाख कोटी रुपये जमा.
२. **उत्पन्न घोषित करण्यात वाढ :** प्राप्तिकर विवरण पत्रे भरण्याच्या संख्येत लक्ष्मणीय वाढ (गत वर्षांच्या तुलनेत ९.९%). ५ ऑगस्ट २०१७ पर्यंत विवरणपत्र भरणाऱ्या लोकांच्या संख्येत २४.७ % वाढ. नोव्हेंबर २०१६ ते मे २०१७ पर्यंत १७,५२६ कोटी अघोषित उत्पन्नाची नोंद. १,००३ कोटी रुपये जप्त झाले.
३. **एकूण चलनाच्या मूल्य :** भारतीय एकूण चलनाच्या मूल्याच्या ८४% रक्कम ५०० आणि १००० च्या नोटांमध्ये उपलब्ध होते .
४. **दहशतवाद आणि नक्षलवाद** : दहशतवाद आणि नक्षलवाद यांना मिळणारे आर्थिक पाठबळ कमी झाले.
५. **सकल राष्ट्रीय उत्पादन (जी.डी.पी)** : देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादन (जी.डी.पी) वाढीचा दर ५.७ टक्क्यांवर घसरला.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 138- Effect of Demonetisation on Indian Economy
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

६. **असंघटित कामगारांना फटका :** बांधकाम व उद्योग क्षेत्राला तसेच या क्षेत्रातील असंघटित कामगारांना फटका बसला.

**ऐ) नोटाबंदीने काय मिळवले, काय गमावले ? :**

**लेखा जोखा :**

काळया पैशाची निर्मिती, त्याची वाढत चाललेली कीड, बनावट नोटांचे भयानक संकट यांच्या जोडीला दहशतवादी कारवायांसाठी वापरला जाऊ लागलेला बेहिशेबी पैसा, करचुकवेगिरी, भ्रष्टाचाराचा भस्मासुर या साऱ्यातून काळया पैशाने संपूर्ण समाजव्यवस्थेत एक समांतर अर्थव्यवस्था निर्माण झालेली होती आणि त्याचा फटका तमाम देशाला, देशवासीयांना वर्षानुवर्षे बसत होता. गेल्या २५ वर्षांत अशा पैशाविरोधात त्या-त्या वेळच्या सरकारने,त्या-त्या वेळच्या नेतृत्वाने पावले उचललीदेखील आहेत. त्यांना काही प्रमाणात यशदेखील मिळाले पण या भस्मासुराचे पूर्णत : उच्चाटन होऊ शकलेले नाही. नोटाबंदीच्या निर्णयाचा निर्धारित कालावधी संपल्यानंतर हाताशी काय लागले, याचा लेखाजोख नक्कीच मांडावा लगेल. आपल्या देशात राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५० टक्के इतका काळा पैसा असल्याचे बोलले जात होते. त्यापैी १०% टक्के परदेशात आहे. त्यामुळे पैशासाठी आधी आपल्या देशातच लक्ष केंद्रित करायला हवे होते. तसे मोदींनी केलेही. आता या निर्णयाचे सर्वच सकारात्मक परिणाम झाले का, तर निश्चितच नाही.

**अपेक्षेपेक्षा अधिक नोटा बाहेर :**

पाचशे व हजारच्या अंदाजे १४ लाख कोटींच्या नोटा बाजारात असल्याचे सांगितले जात होते. काळया पैशाच्या रुपात या नोटा साठवल्या जात असतील तर त्यापेक्षा कमी नोटा बाहेर यायला हव्या होत्या. अंदाजे ३ लाख कोटींच्या नोटा तरी यात रद होऊन जातील, असा सरकारचा अंदाज होता, मात्र, प्रत्यक्षात या आकडयापेक्षा अधिक नोटा बाहेर येऊन बँकेत जमा झाल्या आहेत. याचा अर्थ बनावट नोटांचा भरण बँकांत झाला असण्याची दाट शक्यता आहे. आता ते शोधून काढण्याचे मोठे आव्हान सरकारसमोर असेल.

**सर्वसामान्यांना मोठा त्रास :**

चलन उपलब्ध होत नसल्याने, जेथे सारे काही रोखीत चालते, अशा रोजंदारीसारख्या कामावर विपरीत परिणाम झाला. यामुळे ग्रामीण भागात बेरोजगारी वाढली. हातावर पोट असणाऱ्या कष्टकऱ्यांचे झालेले हाल विसरता येणार नाहीत. चलनवाढ नियंत्रणात आल्याचा एकीकडे आनंद असताना शेतमालाल कवडीमोल भावही याच काळात मिळाला आणि त्यामुळे शेतमालाशी निगडित बाजारपेठेला आणि पर्यायाने शेतकरीवर्गाला बसलेला फटकाही तितकाच चिंताजनक आहे.

**सराफी, व बांधकाम क्षेत्राला (रिअल इस्टेटला) फटका :**

नोटाबंदीचा मोठा फटका सराफी तसेच बांधकाम अर्थात रिअल इस्टेट क्षेत्राला मोठा बसला. या क्षेत्रात सर्रासपणे काळया पांढऱ्या पैशाचे व्यवहार होत होते, हे उघड गुपित आहे. सरकारच्या कडक पवित्र्यामुळे तेथे मोठा चाप बसला आहे. सोने-चांदीच्या बाजारपेठेतही बहुतांश व्यवहार हे रोखीनेच होताना दिसत. परंतु तेथेही काही मंडळींकडून काळयाचे पांढरे करण्याचे उद्योग सर्रासरणे व्हायचे. काळया पैया च्या किंवा रोखीच्या स्वरुपात सर्वाधिक व्यवहार होणाऱ्या या दोन क्षेत्रांवर सरकारचे विशेष लक्ष असल्याचे अलीकडच्या काळातील छाप्यावरुन दिसून आले आहे. आता या क्षेत्रातील मंडळीही काळया पैशाला थारा न देता सावधपणे व्यवहार करतील, अशी अपेक्षा आहे. या निमित्ताने हात पोळलेले लोक काळा पैसा घेणे बंद करतील आणि त्याद्वारे अप्रत्यक्षपणे करसंकलन वाढेल , अशी आशा आहे.

**अर्थव्यवस्थेला झळ :**

नोटाबंदीची सर्वार्थाने झळ बसणार आहे ती आपल्या अर्थव्यवस्थेला काही पतमापन संस्थांच्या मते, २०१६-१७ साठीच्या एकूण देशांतर्गत उत्पादनात (जीडीपी) ०.४० टक्क्यांची घसरण होईल, असे म्हटले जाते. काही तज्ज्ञांच्या मते, ही घसरण अर्धा टक्क्यांपासून ३.३० टक्क्यांपर्यंतही असू शकते. ही झळ या वर्षापुरती नव्हे, तर पुढच्या आर्थिक वर्षापर्यंत जाणवेल, असेही बोलले जाते. अर्थात रोकड तरलतेचे तातडीने निराकरण होईल आणि 'कॅशलेस' व्यवहारांकडे मोठया प्रमाणात ओढा वाढेल, असे गृहीत धरुन बांधलेला हा अंदाज आहे. परंतु, आपल्याकडे रोखीत व्यवहार करणारी मोठी लोकसंख्या आहे व ती इतक्या लवकर 'कॅशलेस' कडे वळेल, असे वाटत नाही. हे लक्षात घेतले तर जीडीपी च्या वाढीला बसणारी खीळ आणखी मोठी असू शकेल आणि ती सुरळीत होऊन पूर्वपदावर यायला ३ ते ४ तिमाहींचा काळ लागेल, असा अंदाज आहे.

**बँकांसमोर मोठे आव्हान :**

नोटाबंदीच्या काळात सर्वाधिक चचेत राहिलेले क्षेत्र म्हणजे बँकिग. कारण प्रामुख्याने बँकांच्या (आणि टपाल कार्यालये) माध्यमातून नोटाबंदीनंतरची कार्यवाही केली गेली. बँकाना नेहमीपेक्षा अधिक महत्व आले. तेथील अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही अहोरात्र काम करुन या मोहिमेत सक्रिया सहभाग नोंदविला, हे निधितच कौतुकास्पद आहे. पण त्याचबरोबर दुसरीकडे काही बँक कर्मचाऱ्यांना हाताशी धरुन काही मंडळींना काळयाचे पांढरे करुन दिल्याचेही उघड झाले. त्यासाठी जनधन खात्यांचा वापर केला गेला.मूळ मुदा आहे तो नोटाबंदीच्या काळात बँकांकडे अफाट प्रमाणात जमा झालेल्या पैशाच्या. या पैशावर आता किमान व्याज तरी बँकांना द्यावेच लागणार आहे. व्याजाची ही रक्कम प्रचंड असणार आहे. त्यामुळे शक्य तितक्या लवकर हा पैसा कर्जरुपाने बाजारात गेला पाहिजे, याची काळजी बँकांना घ्यावी लागणार आहे.

**सकारत्मकतेला वेळ लागेल :**

नोटाबंदीच्या धाडसी निर्णयानंतरच्या अशा विपरित परिणामांची विस्तृत चर्चा झाल्यांनंतर, या मंथनातून सकारात्मक काहीच बाहेर आले नाही का, असा प्रश्न पडू शकतो. पण वस्तुस्थितीही तितकीही वाईट नाही. किमान मोठया मूल्याच्या नोटांच्या रुपात काळा पैसा बाळगणाऱ्यांना जोर का झटका, जोर से लगे चा प्रत्यय नक्कीच आला असणार. किमान रोखीत बाळगलेला काळा पैसा तरी नष्ट झाला. थोडक्यात सांगायचे, तर रोखीतील समांतर अर्थव्यवस्था मोडून निघण्यात यश आले आणि ती मूळ प्रवाहात आणण्यास मदत झाली, हेही नसे थोडके. नोटाबंदीच्या निर्णयाचे नकारात्मक परिणाम मोठया प्रमाणात समोर दिसले किंवा आणले गेले. नकारात्मकतेच्या या वातावरणातून बाहेर पडायला अजूनही वेळ लागणार आहे. मोंदीच्या महत्वाकांक्षी निर्णयांचे खरेखुरे परिणाम दीर्घकाळातच दिसू शकणार आहेत.

**कॅशलेस की लेसकॅश व्यवहार ?:**

काळया पैशाची निर्मिती रोखण्यासाठी आता सरकारचा भर कॅशलेस व्यवहारांवर राहणार आहे. त्यासाठी सरकारने विविध योजनाही जाहीर केल्या आहेत. नोटाबंदीच्या काळात कॅशलेस व्यवहारांच्या प्रमाणात अचानक मोठी वाढ झाल्याचेही दिसून आले. परंतु कोठेच संपूर्णपणे कॅशलेस व्यवहार होऊ शकत नाहीत, फार ते लेसकॅश व्यवहार होऊ शकतात, हे सत्यही आपण स्वीकारले पाहिजे. परंतु एकूणच जगात व्यवहारांसाठी रोख रकमेचा पर्याय प्राधान्याने वापरला जातो. सरासरी हे प्रमाण ८५ टक्के आहे. काही विकसित देशांमध्ये रोखीतील व्यवहार ५० टक्क्यांपेक्षा कमी आहेत. पण मुळात भारत ही कॅश इकॉनॉमी आहे आणि येथे ९२ ते ९५ टक्के व्यवहार रोखीत होतात, हेही लक्षात घेतले पाहिजेत. शिवाय ग्रामीण भागात स्मार्टफोनचे अल्प प्रमाण आणि इंटरनेटच्या कनेक्टिव्हिटी समस्या आहेच. या जोडीला

ISSN : 2348-7143
February-2019

डिजिटली साक्षर असण्याचे प्रमाणही कमीच आहे. त्यामुळे सुरवातीला कॅशलेस ऐवजी आपल्याला लेसकॅश कडे प्रवास करता येऊ शकेल, असे वाटते. तेवढे

झाले तरी खुप काही साध्य केल्यासारखे असेल.

**निष्कर्ष :**

नोटबंदी मुळे भारतीय अर्थव्यवस्थेत मोठया प्रमाणात महत्वपूर्ण बदल झालेले दिसून येतात. नोटबंदी मुळे अनेक क्षेत्रावर चांगले आणि वाईट परिणाम झालेले दिसून येतात. नोटबंदी मुळे अर्थव्यवस्थेतील बेहिशेबी पैसावर नियंत्र आणण्यास मदत झाली.

**संदर्भ :**

१. www.rbi.org.in
२. : http://niti.gov.in/content/demoetiyation,pib.nic.in,india.gov.in
३. सकाळ year Book जानेवारी २०१७ ते डिसेंबर २०१७ -२०१८
४. सकाळ - हथर बुक, २०१८
५. सकाळ - करंट अपडेटस, २०१८ खंड १